*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*



# Unit 3

# Aristotle

## ॲरिस्टॉटल

1: परंपरेला प्रतिसाद : प्लेटोच्या चिद्वादावरील टीका आणि ज्ञानविषयक मते, सत् आणि भवन.

2: द्रव्य : एक पदार्थ, आकार आणि जडद्रव्य संकल्पना .

3: परिवर्तनाची समस्या, चार कारणे, अभिव्यक्तक्षमता आणि वास्तव क्षमता.

---

## प्रस्तावना

ॲरिस्टॉटल हा प्लेटोचा शिष्य. त्याचा जन्म प्राचीन ग्रीसमधील थ्रेस या प्रांतातील स्टॅगिश या गावात झाला. त्याचा पिता निकोमॅकस हा राजवैद्य होता.पित्याने ॲरिस्टॉटलला वैद्यक शास्त्राचे आणि विज्ञानाचे धडे दिले. 17 व्या वर्षी तो अथेन्सला गेला.तेथे प्लेटोच्या ॲकॅडमीत त्याला प्रवेश मिळाला.या वेळेस प्लेटो 60 वर्षांचा होता. ॲरिस्टॉटल प्लेटोबरोबर 20 वर्षे, म्हणजे त्याच्या मृत्यूपर्यंत (ख्रिस्तपूर्व 347) राहीला.त्यानंतर ॲकॅडमीतील अधिका-यांशी मतभेद झाल्याने त्याने ॲकॅडमी सोडली. प्लेटोच्या मृत्यूनंतर मात्र तो लगेच ॲटेनिअसचा राजा हर्मिअस याच्या दरबारी तीन-चार वर्षे राहिला.पुढे सिसिली बेटावर त्याने तीन वर्षे अध्यापन केले. आणि एक प्रयोग केला.[1]

ॲलेक्झॅंडेरने आपलया पूर्वेकडील स्वा-या सुरु केलयावर ॲरिस्टॉटल ॲथेन्सला परतला. त्याने लिसिअम नांवाचें आपलें स्वतंत्र विद्यापीठ स्थापन केले. ह्या विद्यापीठांत त्याने 12-13 वर्षे अध्यापन केलें व विद्यापीठाचें सर्व कामकाज पाहिलें.शिष्यांसमवेत बागेतून येरझारा घालीत शिकविण्याची त्याची पध्दती होती.त्यामुळे त्याच्या पंथाला ***'पेरिपॅटेटिक स्कूल'*** **किंवा** ***'येरझा-या संप्रदाय'*** असें नांव पडलें.

ॲलेक्झॅंडरच्या मृत्यूनंतर त्याने यूबियामधील कॅन्सिस गावीं पळ काढला व तेथेच तो इ.स.पू.322 मध्ये मरण पावला.ॲरिस्टॉटलच्या जीवनांत एकूण तीन महत्वाचे कालखंड दिसून येतात :

(1) प्लेटोच्या विद्यापीठांतील काळ

(2) संक्रमणाचा काळ: ॲसस, मिटोलीन व मॅसिडोनियाचा दरबार येथे अध्यापनकार्य.

(3) ॲथेन्समधील लिसिअम विद्यापीठाचा प्रमुखपदाचा काळ .

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

---

[1] हा प्रयोग म्हणजे राज्यकर्त्याच्या मनावर राजकीय आणि नैतिक तत्वांचा संस्कार करण्याचे काम ! हे कार्य वस्तुतः प्लेटोला करावयाचे होते. प्लेटोने त्याच्या 'रिपब्लीक' या ग्रंथात आदर्श राज्याची संकल्पना मांडली या संकल्पनेनुसार 'राजा हा तत्वज्ञ असावा' हा प्लेटोने मांडलेला हा सिध्दांत प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न होता. ॲरिस्टॉटलने सिसिली बेटावर ॲलेकझांडरवर हा प्रयोग केला. मॅसिडोनियाचा राजा फिलिप, याच्या निमंत्रणावरून राजपुत्र ॲलेक्झॅंडर (ॲलेक्झॅंडर दि ग्रेट) याचा शिक्षक म्हणून त्याने इ. स. पू. 342-335 असें सात वर्षे काम केले. ॲरिस्टॉटल यावेळी चाळीशीच्या आसपास होता. तर अलेक्झांडर 13 - 14 वर्षांचा मुलगा होता.तो अत्यंत उद्धट, अंधश्रध्दाग्रस्त आणि खुनशी होता. मोठेपणी त्याने जग जिकंण्याचा प्रयत्न केला.त्याला तत्वज्ञान शिकविण्याचा ॲरिस्टॉटलचा प्रयोग केला. तो प्रयोग फसला


*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*



ॲरिस्टॉटल हा असामान्य बुध्दीचा व तर्कशुध्द रीतीने विचार करणारा महान् तत्वज्ञ होऊन गेला. कवि डॅटेने त्याचा *'ज्ञानियांचा राजा'* या शब्दांत गौरव केला आहे. प्लेटो व डेमोक्रिटस यांचा ॲरिस्टॉटलने समन्वय केला असें म्हणतां येईल.

ॲरिस्टॉटलने तत्त्वज्ञानाला आणि चिंतनाला शिस्त आणली.त्याच्याच तत्त्वज्ञानाला *'आद्य तत्त्वज्ञान'* **(First Philosophy)** म्हणतात. *"ॲरिस्टॉटलने ज्याचा विचार केला नाही, ज्याचे शास्त्र बनविले नाही, असा एकही विषय या जगात नाही,"* असे म्हणतात. म्हणून ॲरिस्टॉटलला *'विचारवंताचा विचारवंत' (The Thinker of the thinkers)* किंवा **'आचार्य' (The Master)** म्हंटले जाते.हा जगातील पहिला खरा आचार्य होय.त्याने किमान एक हजार पुस्तके लिहिली असावीत, असा इतिहासतज्ञांचा अंदाज आहे.

## ॲरिस्टॉटलच्या चिंतनाचे मध्यवर्ती सूत्र



ॲरिस्टॉटलच्या मते ज्ञानाचे तीन मुख्य प्रकार

1. **तात्विक ज्ञान**
   (Theoretical Philosophy)
2. **व्यावहारिक तत्वज्ञान**
   (Practical Philosophy)
3. **उत्पादक ज्ञान**
   (Productive Philosophy).

तात्विक ज्ञान हे स्वत:साठी म्हणजे ज्ञानासाठीच असते, व्यावहारिक तत्वज्ञान कृतीप्रत नेणारे तर उत्पादक ज्ञान उपयुक्त अथवा सौंदर्यपूर्ण गोष्टींची निर्मिती करणारे असते.ॲरिस्टॉटलच्या मते सर्वश्रेष्ठ स्वरुपाचे व्यावहारिक ज्ञान **'राज्यशास्त्र (Politics)'** होय. आजच्या काळातील माणसाच्या राज्याव्यतिरिक्त (State), इतर संस्थांच्या सभासदत्वामुळे आपण या शास्त्रास समाज विज्ञान म्हणून शकतो.

## परंपरेला प्रतिसाद : प्लेटोच्या चिद्‌वादावरील टीका आणि ज्ञानविषयक मते

ॲरिस्टॉटलने प्लेटोच्या सत्ताशास्त्रावर व ज्ञानशास्त्रावर कठोर टीका केली या टीकेतून त्याचे स्वत:चे सत्ताशास्त्र निर्माण केले. या एकूण चिंतनास *'आद्य तत्त्वज्ञान'* **(First Philosophy)** असे म्हणतात. विश्वाचे आदीकारण असलेल्या तत्त्वाचे ज्ञान म्हणजे आद्य तत्वज्ञान,अशी ॲरिस्टॉटलची कल्पना होती.इतर ज्ञानशाखा विश्वाच्या एखाद्याच भागाचा अभ्यास करतात, तर तत्वज्ञानात तर त्या सर्वाचा उगम ज्यातून झाला आहे, अशा मूलतत्त्वाचा अभ्यास केला जातो, असे त्याचे मत होते.या आधारे त्याने तत्त्वज्ञान प्रधान आणि शास्त्रे गौण असे विषयांचे वर्गीकरण केले.

ॲरिस्टॉटलची आदीकारणाची कल्पना प्लेटोच्या कारणाशी जुळते. किंबहुना प्लेटोचे सत्ताशास्त्र थोड्याफार फरकाने ॲरिस्टॉटलने स्वीकारले. त्याचे आद्य तत्त्वज्ञान अनादी अनंत,शाश्वत,स्थिर,नित्य, अपरिवर्तनीय अशा अंतिमतत्वाचा अभ्यास करते.त्याच्या या तत्वमीमांसेला (Metaphysics) - अध्यात्मशास्त्र - असे म्हटले जाते Meta=beyond, or about म्हणून Metaphysics = beyond physics म्हणजेच भौतिक

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*



सृष्टीज्ञानापलीकडील ज्ञान. भौतिक सृष्टीचे ज्ञान विविध विज्ञाने करतात (Sciences) आणि त्या पलीकडील 'अंतिम तत्वज्ञानाचे चिंतन' (metaphysics : First philosophy) असे नाव [2] दिले गेले.

ॲरिस्टॉटलचे सत्ताशास्त्र त्याने प्लेटोच्या आयडीया सिध्दांतावर केलेल्या टीकेतून विकसित झाले.प्लेटोच्या चिंतन प्रणालीत असलेले दोष नाहीसे करुन ती निर्दोष मांडण्याचा त्याचा हा प्रयत्न होता एका अर्थाने त्याने केलेले हे प्लेटोचे शुदधीकरण होय.ती जणू स्वतंत्र तत्वमीमांसा होती.ही टीका पुढीलप्रमाणे :-

## (1) सामान्य व आयडीया

ॲरिस्टॉटलच्या मते प्लेटो ज्यास आयडीया म्हणतो ते मुळात वस्तूवरील सामान्य (Universal)आहे. वस्तूमध्ये आढळणारा समान गुण किंवा ज्याच्या आधारे वस्तू अस्तित्वात येते त्यास ॲरिस्टॉटल ***सामान्य*** म्हणतो.

प्लेटो वस्तूंपासून आयडीया वेगळी करतो, तिला स्वतंत्रपणे अस्तित्व देतो.ॲरिस्टॉटल असे करीत नाही. त्याच्या मते वस्तूंपासून वस्तूंमधील ***सामान्य*** कधीही वेगळे करता येत नाही. जसे अश्वत्व आणि अश्व यांच्यात काहीतरी संबंध असतोच; म्हणून तर ती वस्तू त्या नावाने ओळखली जाते.असा संबंध नसेल तर ती वस्तू ही तीच वस्तू आहे, हे कळू शकणार नाही. ही व्यवहारिक अडचण आहे. पण प्लेटो ही अडचण लक्षात न घेता आयडीया वस्तूंपासून स्वतंत्र अस्तित्वात असते आणि ती वस्तूच्याच नावाने ओळखली जाते असे म्हणतो, ते चूक आहे वस्तूत: आयडीया म्हणजे सामान्य व ते वस्तूंमध्येच वसत असते, वेगळे अस्तित्वात नसते. ही मूलभूत टीका ॲरिस्टॉटल करतो.

### (2) प्लेटोचे आयडीयांचे तत्व अशास्त्रीय आणि निरुपयोगी. कारण ,

अ) प्लेटो आयडीयांची संख्या वाढवतो पण त्यामुळे जगातील घटनांचे स्पष्टीकरण होत नाही.

ब) अमूर्त आयडीयांचे ज्ञान झाले म्हणून प्रत्यक्ष वस्तू कळाली याचे ज्ञान होईलच असे नाही.

क) वस्तू व घटना यांच्यातील हालचालींचे स्पष्टीकरण व आयडीया देऊ शकत नाही.

ड) आयडीया प्रज्ञेलाच ज्ञात होतात, हे म्हणणे योग्य नाही.कारण त्या इंद्रियांना सुध्दा कळतात. उदा. अश्वत्व ही आयडीया प्रत्यक्ष इंद्रियांदवारे अश्व पाहिला जातो तेव्हा लक्षात येतोच.

वरील कारणांमुळे आयडीया सिध्दांत निस्तेज ठरतो. जगात एकही माणूस नसेल तर अशा या जगाचे ज्ञान कोणाला कधीच होणार नाही दिव्य जग असून तरी उपयोग काय ? ॲरिस्टॅटलची उपयुक्ततावादी प्रवृत्तीचा असल्याने आणि वास्तववादी विचारवंत असल्याने जे मानवाला वास्तवात उपयोगी पडते,त्यालाच महत्व देतो.

## (3) तृतीय पुरुषाचा युक्तीवाद

ॲरिस्टॉटल म्हणतो की, प्लेटोचा आयडिया सिध्दान्त स्वीकारला तर जेथे जेथे दोन वस्तू, पदार्थ किंवा व्यक्ती असतात व त्यांच्यात साम्य असते तेथे साम्य व्यक्त करण्यासाठी आणखी एक आयडीया लागते. ही तिसरी आयडिया होय.

उदाहरणार्थ सर्व माणसांमध्ये एखादा सामान्य गुणधर्म असतो. तो ज्याच्यात सामावलेला आहे, आणि ज्यातून ती समानता व्यक्त होते, अशी आणखी एक सामान्य माणसाची आयडीया लागेल. आणि असे सतत घडेल ! म्हणजे

---

[2]ॲरिस्टॉटलच्या तत्त्वचिंतनाला metaphysics हे नाव त्याने स्वतः दिले नव्हते. त्याच्या मृत्यनंतर किमान शंभर वर्षांनी त्याच्या सर्व लेखनाचे, त्याच्या निबंधांचे वर्गीकरण ॲड्रोनिकस ऑफ ऱ्होड्स या ग्रंथपालाने केले. ॲरिस्टॉटलच्या सर्व लेखनाची त्याने क्रमवारी लावली, त्यात आधी विविध नैसर्गिक व सामाजिक शास्त्रे लावली गेली.शेवटी भौतिक शास्त्र आले आणि त्यानंतर कार्यकारण, ईश्वर, प्लेटोवरील टीका असे लेखन आले. सर्व भौतिक विज्ञानानंतर ते आले म्हणून त्यास metaphysics असे नाव ॲड्रोनिकसने दिले.

Department of Philosophy Sangamner College

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

काही माणसे आणि त्यामागील आयडीया व्यक्त करण्यासाठी आणखी एका मानवाची कल्पना अशी साखळीच निर्माण होते.म्हणजेच जर आपण प्लेटोच्या म्हणण्यानुसार गेलो तर मुळातील माणसाचा आयडीया, ती व्यक्त होणारी प्रत्यक्ष माणसे आणि पुन्हा त्यांची आयडीया आणि पुन्हा ती आयाडिया आणि माणूस यांच्यातील साम्य ओळख यासाठी आणखी एक मानवाची आयडीया किंवा प्रत्यक्ष तिसरा माणूस आवश्यक बनतो. या तिस-या मानवाला ॲरिस्टॉटल *तृतीय पुरुषाचा युक्तीवाद* असे म्हणतो. असा तिसरा माणूस लागणे, हा प्लेटोच्या सिध्दांत दोष आहे अशा टीका ॲरिस्टॉटल करतो.



## (4) आयडीयांचे जग अज्ञात

आयडीया ह्या वस्तूंचे सार असतात, शिवाय त्या वस्तूंचे बाहेर स्वतंत्रपणे असतात, असे प्लेटोचे म्हणणे विरोधी चमत्कारिक आहे. आयडिया जर वस्तूंचे सार असेल तर इंद्रियसंवेद्य वस्तूच्या बाहेर कशी राहू शकेल ? सार असेल तर विशिष्ट वस्तूमध्येच ते वसत असणारे असले पाहिजे.वस्तू सोडून सार स्वतंत्रपणे अस्तित्वात असेल तर त्याचे ज्ञानच होणार नाही ! असा मुद्दा ॲरिस्टॉटल उपस्थित करतो. म्हणजेच आयडीयांच्या जगाचे ज्ञान होवू शकत नाही.

## (5) संख्येच्या आयडीयांचा अभाव

प्लेटोच्या मते आयडीया वस्तूंच्या अस्तित्वास कारणीभूत असतात. आयडीयाबरहूकूम वस्तू निर्माण होते.मग संख्येची आयडीया काय करते ? असा आक्षेप ॲरिस्टॉटल घेतो. उदा. शून्य, एक, दोन, त्रिकोण, चौकोन इ.आयडीया काय निर्माण करतात ? तर काहीच नाही मग त्यांना *कशाचे सार* म्हणणार ? म्हणून ॲरिस्टॉटल म्हणतो संख्येची आयडीया असू शकत नाही. कारण संख्या कोणही वस्तूंनिर्माण करीत नाही. दूसरे प्रत्येक संख्या एकच असते.

अशा प्रकारे, प्लेटोच्या आयडीया सिध्दांतातील दोष दाखवून ॲरिस्टॉटल स्वत:ची सामान्य विषयक उपपत्ती (Theory of Universals) मांडतो. आयडीयालाच एका अर्थाने तो सामान्य म्हणतो, तिलाच तो **द्रव्य (Substance)** असेही नाव देतो. त्याचा हा सिध्दांत पुढीलप्रमाणे :-

## ॲरिस्टॉटलची ज्ञानाची संकल्पना : सामान्ये आणि अव्यक्षमता व वास्तविकता

ॲरिस्टॉटलने प्लेटोच्या 'आयडीया' या 'आयडीयावरच' टीका किती, त्या सिध्दांतातील ठळक दोष त्याने स्पष्ट केले. विशेषत: प्लेटोची आयडीया विशिष्टापासून स्वतंत्र, वेगळे, अस्तित्वात असते या विचारावर तो कडाडून टीका करतो, तसेच आयडीया विशिष्टांचे सार असते आणि त्याचवेळी ती वस्तूच्या बाहेर स्वतंत्रपणे अस्तित्वातही असते, या दाव्यातही विरोध आहे, ही कल्पनाच अशक्य व तर्कदृष्ट आहे, अशीही कडक टीका करतो.

प्लेटो ज्याला आयडीया म्हणतो, त्यालाच ॲरिस्टॉटल *सामान्य* म्हणतो, तथापि त्याच्यामते, सामान्य हे काही वस्तूपासून वेगळे नसते ते वस्तूमधूनच व्यक्त होते. आणि हे सामान्य विज्ञानाचा विषय असते.

ॲरिस्टॉटलच्या मते विज्ञान *सामान्य* नियमांचा शोध घेते. आणि सामान्य अनुभवास येणा-या वस्तूंमध्ये असते, त्याच्या मते *सामान्य* या नावाचे काहीतरी तत्त्व वैज्ञानिकांना आणि सामान्य माणसालाही लागते. जर, सामान्य नावाचे काहीही तत्व नसते तर वैज्ञानिक आणि सामान्य माणूस वस्तूंचे वर्गीकरण करुच शकला नसता. उदा. चप्पल, शेळी, टेबल, पुस्तक, शर्ट, चष्मा ही सामान्य नावे आहेत. असे नाव देणे ही एका व्यापक अर्थाने ह्या वस्तूंचे वर्गीकरण असते.

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

या सामान्यांचे स्वरुप काय असते, तेच विज्ञान शोधते.वर्गीकरणामुळे सामान्य माणसाचे व्यवहार सोपे होतात. त्यामुळेच सामान्याचे अस्त्वि स्विकारावे लागते. सामान्य संख्येने एक असते व स्वरुपाचे अमूर्त असते आणि ते नेहमी विशिष्ट वस्तूमध्ये राहते. थोडक्यात सामान्य वस्तूंमधून व्यक्त होते,ते संख्येने अनेक आणि मूर्त असते. ॲरिस्टॉटलच्या या युक्तीवादाला प्लेटो स्वत:ही मान्यता देतो.

थोडक्यात प्लेटोच्या मते आयडीया वस्तूपासून स्वतंत्र असते. ती विज्ञानाच्या नव्हे, तर धर्माचा ज्ञान विषय असते.कारण सर्वोच्च शिव हाच ईश्वर आहे, तो धर्मानेच लाभतो.तर ॲरिस्टॉटलच्या मते *सामान्य* हे वस्तूमध्येच असते, स्वतंत्र नसते आणि ते विज्ञानाचा विषय असते. धर्माचा नव्हे, असे सांगतो. एका अर्थाने प्लेटोच्या आध्यात्मिक सिदधांताला ॲरिस्टॉटलने वैचारिक स्वरुप देवून ते परलोकातून भूलोकात आणले. तेथून वैज्ञानिक संकल्पना आस्तित्वात आली.



आता सामान्य ज्यातून प्रकट होते ते विशिष्ट हेच खरे अस्तित्व असते, असे ॲरिस्टॉटलचे मत आहे पूर्वी सामान्यालाच द्रव्य मानले जाते असे.पण ॲरिस्टॉटलने मात्र विशिष्टालाच द्रव्य मानले.याची मुख्य **दोन कारणे** आहेत :

***एक,*** विशिष्टालांना गुणधर्म लागू पडतात आणि विधानात ते विधेय म्हणून येते.म्हणजेच त्या गुणधर्माविषयी काहीतरी माहिती देता येते.

**दुसरे** म्हणजे सामान्याला कसलेही गुणधर्म किंवा विधेय लागू पडत नाही, कारण सामान्य अमूर्त असते. आणि आस्तीत्वात नसते. त्यामूळे भाषेत विधेय म्हणून त्याचे स्पष्टीकरण करणे शक्य नसते. त्या उलट विशिष्ट मात्र मूर्त असते, अस्तित्वात असते. अशा मूर्त विशिष्टाचेच गूणधर्म सांगता येतात, ते विधेयात मांडता येते, म्हणजे भाषेत स्पष्ट करता येते.

याचा अर्थ विशिष्टालाच द्रव्यत्व असते. खूर्ची टेबल, झाडे, माणूस या सर्व विशिष्ट वस्तू आहेत. खूर्चीत्व, टेबलत्व, द्रव्यत्व यांनी प्लेटो आयडीया म्हणतो पण ॲरिस्टॉटल द्रव्य म्हणतो. क्ष टेबल या विशिष्ट मूर्त वस्तूतून प्रकट होते, म्हणून तेच आस्तीत्वात असलेले द्रव्य आहे. असे ॲरिस्टॉटल सांगतो, त्यामध्ये प्लेटो म्हणतो तसेच ॲरिस्टॉटल आयडीयाला अस्तित्व देत नाही, तर सामान्याला अस्तित्व बहाल करतो आणि त्यालाच नंतर द्रव्य हे नाव देतो, पण सामान्य म्हणजेच द्रव्य नव्हे, तर विशिष्ट ते द्रव्य असते, ते ' सामान्य ' सारखे भासते, एवढेच.

असे दिसते की, ॲरिस्टॉटल सामान्याचा सिध्दांत सांगतो आणि अत्यंत वेगळ्या संदर्भात त्यालाच द्रव्य असेही नाव देतो. या द्रव्य शब्दाचे तो दोन अर्थ करतो ते पुढीलप्रमाणे :-

[1] भौतिक द्रव्य **(Matter)** आणि आकार **(form )** यांनी मिळून बनते तो ***सामान्य द्रव्य.***

[2] जे विशिष्ट द्रव्याचे आकार दर्शवते ते ***विशिष्ट द्रव्य.***

हे विशिष्ट द्रव्य पहिल्या भौतिक द्रव्य आणि आकार याचा संयोग असते.येथे पहिल्या अर्थाचे मिश्रण उघडपणे स्पष्ट होते. उदा. टेबलाचे विशिष्ट लाकूड हे भौतिक द्रव्य असून सपाट चार पायांचे, काळपट हा त्याचा आकार, या गुणधर्मानी मिळून प्रत्यक्षात दिसणारे ते विशिष्ट टेबल होय.

ॲरिस्टॉटलच्या मते, द्रव्य म्हणजे सामान्य आणि विशिष्ट या दोघांचा संयोग होय. द्रव्य हे विशिष्टांमध्ये वसत असणारे सामान्य असते, याचा अर्थ असा की, जे द्रव्य असते, फक्त तेच विशिष्ट वस्तू असू शकते. कारण विशिष्टालाच गुणधर्म असतात.ते गुणधर्म व द्रव्य याचे घनिष्ठ संबंध असतात, इतके की, ते परस्परांपासून वेगळे राहतात असा विचार सुदधा करता येणे शक्य नाही. उदा. सोने, जड पिवळसर व आकारग्रहण क्षम असते असे

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*



म्हणताना जडत्व, पिवळसरपणा व आकार ग्रहणक्षमता हे *गुणधर्म* सोने या *द्रव्यातच* राहतात, असेच समजले जाते. ते सोन्यापासून वेगळे असू शकत नाही, समजा ते वेगळे केले, तर उरले काय ? काहीच नाही !

याचा अर्थ सोन्याचे गुणधर्म वेगळे केल्याच सोनेच नाहीसे होते. सोने आणि त्याचे गुणधर्म एकमेकांवर अवलंबून असतात याचा अर्थ सोन्याचे गुणधर्म वेगळे केल्यास सोनेच नाहिसे होते. म्हणजे द्रव्य व गुणधर्म परस्परांवलंबी असतात. अगदी तसे माणूस हा मनुष्यत्वावर अवलंबून आहे आणि मनुष्यत्व माणसावर अवलंबून आहे. मनुष्यत्व हे द्रव्य विशिष्ट मानवाशिवाय व्यक्त होऊ शकत नाही. आणि मानव ही विशिष्ट द्रव्याशिवाय जाणले जात नाही. ते दोघेपरस्परभिन्न असतात पण वेगळे नसतात.

थोडक्यात प्लटो ज्याला आयडीया म्हणतो त्यालाच ॲरिस्टॉटल सामान्य म्हणतो. ॲरिस्टॉटल सामान्य व द्रव्य या दोन वेगळ्या संकल्पना मांडतो. द्रव्य सामान्य असते व विशिष्ट वस्तूंमधून प्रकट होते.त्यांच्यात भिन्नता असुनही अवियोज्यता व संयोग संबंध असतो, असे प्रतिपादन करतो.त्याचप्रमाणे प्लेटोने गणित व भूमितीतील पदार्थांना आयडीया म्हणून दिलेले स्वतंत्र अस्तित्व सुदधा ॲरिस्टॉटल धुडकावून लावतो.त्याच्यामते केवळ विशिष्ट वस्तू किंवा व्यक्ती हीच द्रव्य असते आणि गणित व भूमितीतील पदार्थांना विशिष्ट नसतात त्या केवळ संकल्पनाच असतात. त्यामुळे त्यांना द्रव्य म्हणता येत नाही. अशा पदार्थांच्या व्याख्या सुदधा दिशाभूल करणा-या असतात असे ॲरिस्टॉटलचे मत आहे तरीही त्याचे अस्तित्व ज्ञानाच्या प्रणालीत आवश्यक असते. अशा रितीने अरिस्टॉटल प्लेटोवरील टीका आणि टीकेतून निष्पन्न होणारा त्याचा स्वत:चा द्रव्य विषयक सिदधांत मांडतो.

## द्रव्य : एक पदार्थ / अभिकल्प :

ग्रीक भाषेतील Kategoria या शब्दापासून इंग्रजीतील Category हा शब्द बनतो.मराठीत त्यांना अभिकल्प किंवा पदार्थविधा असेही नाव देता येईल.ॲरिस्टॉटला पदार्थ सिध्दांत त्याच्या एकूण तर्कशास्त्राचा एक हिस्सा आहे. Category या शब्दाचे दोन अर्थ तो करतो.

1. विधानातील विधेयपद
2. अस्तित्वाच्या रुपाचा अंतिम अविष्कार.

याच दोन्ही अर्थानुसार हा शब्द त्याच्या तत्त्वज्ञानात वापरला गेला आहे. अरिस्टॉटल वास्तववादी तत्त्ववेत्ता असल्याने पदार्थांना ***विचारांचे वास्तवपदार्थ*** असे म्हणतो. *ज्या पदाने वस्तूस्थिती स्पष्ट केलेली असते आणि जी वास्तवात असते, म्हणूनच तिला अर्थ असता तो पदार्थ.* या पदार्थांना ॲरिस्टॉटल साधा-सरळ ***निरवयव संकल्पना*** असेही नाव देतो, असे एकूण दहा पदार्थ / संकल्पना आहेत. ते पुढीलप्रमाणे :-

| क्रमांक | पदार्थ | उदाहरण |
|---|---|---|
| 1. | द्रव्य (Substance) किंवा सार (Essence) | मनुष्यत्व, टेबलत्व, अशुतत्व इ. |
| 2. | परिमाण (Quantity) | मीटर,किलो, ग्रॅम |
| 3. | गुण (Quality) | शुभ्र, मठ्ठ, स्वच्छ इ. |
| 4. | संबंध (Relation) | दुपार, अर्धा, उंच इ. |
| 5. | स्थल (Place) | बाजारात, शाळेत इ. |
| 6. | काल (Time) | उद्या, गेल्यावर्षी इ. |
| 7. | स्थिती (Position) | उभे असणे, पडलेले इ. |
| 8. | ताब्यात असणे (Possession ) | सशस्त्र असणे, बुध्दीवान असणे. |
| 9. | क्रिया (Action or activity) | जाळणे, कापणे खाणे इ. |
| 10. | निष्क्रीयता (Passive) | पडून राहणे, काहीच न करणे |

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*



या दहा पदार्थांच्या पलीकडे पदार्थांचे अस्तित्व असू शकत नाही. आपला समग्र अनुभव या पदार्थापलीकडे जात नाही. यातील प्रत्येक पदार्थ सरल, निरवयव आहे. एका पदार्थाचे दूस-या पदार्थात रुपांतर होऊ शकत नाही.हे पदार्थ किंवा संकल्पना इतक्या मूलभूत आहेत की त्या आपला कोणताही विचार आहे त्यापेक्षा अधिक चांगल्यारितीने व्यक्त करु शकत नाही.त्या विचारातील पदार्थ असल्याने त्यांना तो ***'विचारांचे पदार्थ'*** **(Catagories of Thoughts)** असे म्हणतो. एखादी वस्तू अस्तित्वात असते किंवा तिच्यासंबंधी आपण विचार करतो त्यावेळेस तिच्या असण्याचा तो भाग असतो. ती रित असते किंवा विचार करण्याची ती पध्दती बनते. द्रव्य हा यातील पहिला पदार्थ आहे.

## द्रव्य संकल्पना आणि आकार

द्रव्याविषयी सामान्यपणे अशी कल्पना असते की द्रव्य हे सदासर्वकाळ द्रव्यच राहाते.एकाच वेळी ते भौतिक किंवा जड असते व त्याचवेळी चिन्मय असते असे नाही. ते सर्व अवस्थांत द्रव्यच राहते.कालाच्या प्रवाहात सुध्दा त्याचे द्रव्यपण नष्ट होत नाही.उदा. पितळ हे कधीही द्रव्याव्यतिरिक्त (धातूव्यतिरिक्त) इतर काही होत नाही. काही वेळा एका प्रकारच्या द्रव्याचे दुस-यात रुपांतर होते. उदा. रेडियम हे हेलियममध्ये रुपांतरीत होते.

ॲरिस्टॉटलची द्रव्यविषयक संकल्पना मात्र सापेक्ष आहे.त्याच्या द्रव्य (matter) व आकार (form) या विषयींच्या संकल्पना वरीलप्रमाणे ठोकळेबाज नसून तरल व लवचिक आहेत.त्याच्या मते,-

1. सर्व प्रकारच्या परिवर्तनात ज्याच्यामध्ये बदल घडून येतो ते द्रव्य असतेच;
2. शिवाय जे काही बनते ते सुध्दा द्र्व्यच असते.
3. जे परिवर्तनीय असते ते सुध्दा द्रव्य.

मग आकार म्हणजे काय ? तर ज्याच्या दिशेने बदल घडतो तो आकार . द्रव्यातील अक्षमतक्षमता प्रकट होवून रूप धारण करती झाली की ती क्षमताच आकार बनते . म्हणजेच **द्रव्य जे आकार किंवा रुप घेते ते म्हणजे आकार असतो.**

उदाहरणार्थ पलंगाच्या संदर्भात लाकडाचा विचार केल्यास लाकूड हे द्रव्य असते.कारण जे पलंग बनते ते लाकूड असते.पण एखाद्या वाढत्या रोपाच्या संदर्भात विचार केला तर तेच लाकूड आकार ठरते.कारण रोपानंतर जे बनते किंवा जे रुप धारण करते ते लाकूड असते म्हणजे रोपाचा ते आकार असते.

इथे आकार (form) म्हणजे केवळ एखादी आकृती होय, असेही समजून चालत नाही.कारण जे एका दृष्टीने आकार असते ते दुस-या एका दृष्टीने द्रव्य असते. पण आकृती (shape) ही आकृतीव्यतिरिक्त इतर काहीही असू शकत नाही. आकृती ही आकाराचा एका भास अवश्य असते, कारण आकारामध्ये वस्तूच्या सर्व गुणधर्मांचा समावेश असतो. आकारामध्ये आकृती, गुणधर्म हे तर असतातच, पण त्याशिवाय त्या वस्तूची रचना, तिच्या भागांचे परस्परसरातील संबंध, आणि सर्व भागांचे तिच्या पूर्ण स्वरुपाप्रत असणारे गौणत्व यांचाही त्यात अंतर्भाव होतो.

ॲरिस्टॉटलच्या मते कार्य हे कारणात अप्रकट, अव्यक्त, व सुप्तरुपात अस्तित्वात असते, ते नव्याने अस्तित्वात येत नाही. शिवाय होणार बदल नेहमी कोणत्यातरी ध्येयाप्रत किंवा उदिदष्टाप्रतच होत असतो.इथे द्रव्यच आकारावर प्रभाव टाकत असते, हे लक्षात घेतले पाहिजे. द्रव्याने ध्येयावर प्रभाव पाडून त्याच्यात गतिमानता निर्माण केली नाही उद्दिष्ट हे उद्दिष्टच राहणार नाही.म्हणून वस्तूमध्ये होणारा बदल तिला जे शेवटी रुप प्राप्त व्हावयाचे असते त्याच्याच प्रभावामुळे होत असतो .

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

अंतिम ध्येय किंवा उदिदष्ट हे जरी परिवर्तन प्रक्रियेत अगदी शेवटी दृश्य स्वरुपात व्यक्त होताना दिसत असले तरी ते अंतिम ध्येय द्रव्याच्या गर्भात सुप्त व अप्रकट रुपाने असलेच पाहिजे, असा निष्कर्ष निघतो. त्यालाच ऑरिस्टॉटल द्रव्य मानतो.

बदल हा ज्या बाह्य व आंतरिक संबंधास कारणीभूत असतात त्या सर्वाचा समुच्चय व त्यांची गुंतागुंतीची सूंदर गुंफण म्हणजे तिचा आकार (form) असतो.वस्तूच्या आकारामध्ये तिच्या कार्याचाही (function) अंतर्भाव होत असतो. हाताचा पंजा जर हातापासून तोडून अलग केला तर त्याचे कार्य संपते व त्याचबरोबर त्याचा आकारही संपुष्टात येतो.देहाच्या हाताचा पंजा हा जिवंत देहाच्या हाताशी तुलना करता त्याचे कार्य संपले असल्याने उच्च प्रकारचा आकार राहू शकत नाही. कारण वस्तू पकडण्याचे त्याचे महत्वाचे कार्य करण्याचे सामर्थ्य त्यात राहीलेले नसते

8

आकारामध्ये वस्तूच्या सर्व गुणधर्मांचा अंतर्भात होत असतो. ज्याला गुणधर्म असतात ते द्रव्य असते. सर्व प्रकारचे गुणधर्म हे सामान्ये (Universals) असतात. उदा. सोन्याच्या पदार्थाचा रंग पिवळा असतो याचा अर्थ इतर सोन्याच्या पदार्थामध्ये जसा पिवळेपणा असतो व इतरही पिवळया पदार्थांच्या ठिकाणी जो पिवळेपणा असतो तो सर्व एकच सामान्यधर्म असतो. एखाद्या वस्तूला एखादा गुणधर्म असे म्हणणे म्हणजे तिचा एका वर्गास समावेश करणे आणि त्या वर्गाच्या (जातीच्या) घटकांमध्ये जे सामान्य गुण असतात ते 'सामान्ये' असतात. वस्तू गुणधर्माविरहित राहू शकत नाही आणि वस्तूशिवाय गुणधर्म राहू शकत नाहीत. याचाच अर्थ द्रव्य व आकार हे परस्परांव्यतिरिक्त राहू शकत नाहीत.

अशा प्रकारे पाहिल्यास जे पूर्णपणे आकारविरहित असते ते द्रव्य असते. द्रव्य हे सर्व वस्तूंची आधारभूमी (Substratum) असते. त्याला स्वत:चा असा कोणताही गुणधर्म किंवा लक्षण नसते. मूलद्रव्य हे पूर्णत: लक्षण व गुणविरहित, अनिश्चित धर्मविरहित असे काहीतरी असते. वस्तूला जे जे म्हणून काही निश्चित रुप, गुणधर्म, लक्षण देते आणि जे जे त्याला अमुक एक (रुपाचे) बनविते ते त्याचा आकार असते. म्हणजे द्रव्यामध्ये कोणताही फरक असू शकत नाही. फक्त वेगवेगळे गुणधर्म असल्याने वस्तू एकमेकीपासून वेगळया ठरतात. द्रव्याला गुणधर्मच नसल्याने त्याच्यामध्ये भेद नसतात.

या वरुन असे दिसते की ऑरिस्टॉटलला अभिप्रेत असलेली द्रव्याची कल्पना ही आपण सर्वसाधारणपणे जे भौतिक द्रव्य म्हणून समजतो तिच्याहून वेगळी आहे. पितळाहून लोखंड भिन्न असते असे आपण म्हणतो. पण ऑरिस्टॉटलच्या मते यात द्रव्याचा भेद नसून तो केवळ आकारातील भेद आहे. म्हणजेच द्रव्यावर ज्या प्रकारचा ठसा उमटेल त्या प्रकारची वस्तू ते बनते. म्हणजेच द्रव्य म्हणजे 'काहीही बनण्याची शक्यता, असते व प्रत्यक्षात किंवा वास्तविकपणे ते अमुक एक असे निश्चित काहीही नसते. त्याला आकाराची प्राप्ती होऊन ते काहीतरी बनते.या त्याच्या भेदावरुनच त्याने जे **'द्वंद्व'** निर्माण केलेले आहे. ते द्वंद्व 'अव्यक्तक्षमता' (Potentiality) आणि 'वास्तविकता' *(Actuality)* हे होय. सुप्त वा अव्यक्तक्षमता म्हणजेच द्रव्य (Matter),वास्तविकता किंवा अव्यक्त किंवा प्रकटता म्हणजेच आकार (form) होय. कारण द्रव्य हे अव्यक्तरुपाने कोणतेही रुप धारण करु शकते आणि काहीही बनू शकते. द्रव्य हे केवळ शक्यता किंवा अव्यक्तक्षमता असते. त्याला हे किंवा ते असे विशिष्ट, निश्चित रुप जे देते, साकार करते ते त्याचा आधार (Form) असते. म्हणजे वस्तूचे प्रत्यक्ष मूर्तत्व किंवा व्यक्तत्व हे तिचा आकार असते.

द्रव्य हे **सत् (being)** आहे आणि तिची आकार धारण करण्याची क्षमता ही संभवनीयता **(Becoming)** आहे. सत् आणि भवन यांचे पुरातन द्वंद्व अशा रीतीने सोडविण्याचा ऑरिस्टॉटलने प्रयत्न केलेला आहे.

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*



## परिवर्तन (Change)

बदल किंवा परिवर्तन होणे म्हणजे काय ? जी वस्तू आधी अस्तित्वात असते तिच्यात रुपांतर होते तेव्हा बदल झाला असे म्हणतात.म्हणजे बदल होण्याच्या प्रक्रियेत जी अव्यक्त, अप्रकट, अमूर्त, सुप्त अशी क्षमता (Potentiality) असते तिला व्यक्त, मूर्त व वास्तविक रुप प्राप्त होत असते. उदा. पाण्याच्या ठिकाणी वाफ होण्याचा गुणधर्म-शक्यता किंवा क्षमता असते.नुसते पाणी असते तेव्हा वाफ ते नसते. पण पाणी बरेच तापविले की ते उकळते, त्याचे रुपांतर वाफेत होते. म्हणजे 'प्रत्यक्ष वाफ' अस्तित्वात येण्यापूर्वी ती पाण्यात अदृश्य, अव्यक्त, सुप्त रुपाने असते व विशिष्ट परिस्थितीमध्ये ती वाफ बनते.पाणीच वाफ बनते.

थोडक्यात पाणी, तापविण्याची प्रक्रिया व वाफ अशी बदलाची प्रक्रिया घडते.तापविण्यापूर्वी पाण्यात वाफ नसते, पाणी वाफरहित असते.पण वाफ होण्याची क्षमता पाणी बाळगून असते.म्हणजेच पाण्याच्या ठिकाणी एका प्रकारचे 'राहित्य / रहितता' किंवा 'न्यूनत्व' असते. वाफ बनल्यानंतर ते राहित्य भरुन निघते.असे सर्व प्रकारच्या परिवर्तनात घडत असते.

याचा अर्थ परिवर्तनाच्या प्रक्रियेमध्ये ॲरिस्टॉटलच्या कल्पनेनुसार तीन गोष्टी अंतर्भूत असतात.

1. द्रव्य (matter) : पाणी हे द्रव्य
2. आकार (form) : वाफ हा आकार
3. न्यूनत्व (privation) : वाफेचे पाण्यात सुप्त असणे हे प्रत्यक्ष पाण्यातील राहित्य !

यात 'आकार' हे जे तत्व असते ते एका विशिष्ट उपजातीतील सर्व घटकांमध्ये साधारण किंवा सामान्य असते. उदा. 'मानव्य' हा आकार प्लेटो, सॉक्रेटिस किंवा कृष्ण, याज्ञवल्क्य, शंकर, तुकाराम, शिवाजी इत्यादी सर्व व्यक्तींना एकच किंवा साधारण किंवा सामायिक असतो.म्हणजे कोणत्याही विशिष्ट वस्तूत किंवा व्यक्तीत जो आकारिक भाग असतो तो सर्वांना सामायिक त्यांच्यातील वैशिष्ट्याला तो जबाबदार नसतो.

म्हणून इंद्रियसंवेद्य वस्तू किंवा व्यक्ती यांच्यामधील 'व्यक्तीभवनाला' (Individuation) नसून द्रव्य (matter) हे कारणीभूत असते.या संबंधात ॲरिस्टॉटल द्रव्यातील अव्यक्त क्षमता शक्ती (Potentiality) व प्रत्यक्ष परिवर्तनाची कृती (Act) यांच्यात फरक करतो. एखादा गवंडी घर बांधू शकतो पण एखाद्या क्षणी तो प्रत्यक्ष घर बांधणीची क्रिया करीत नसेल, किंवा मूर्तिकार मूर्ती घडवू शकतो, पण तो प्रत्यक्षात एखादी मूर्ती घडविण्याची क्रिया करीत नसेल म्हणजे त्याच्या ठिकाणी 'बांधण्याची ' किंवा 'घडविण्याची' शक्ती किंवा क्षमता (Potency) असू शकेल, त्या वेळी प्रत्यक्ष विचार करीत नसेल, पण त्याच्या ठिकाणी विचार करण्याची क्षमता, शक्ती अव्यक्त रुपात असते. म्हणून अव्यक्तक्षमता किंवा विभव (Potentiality) तिच्या रुपात पूर्णपणे विकसित होईपर्यंत अव्यक्तच असते.उदाहरणार्थ लहान रोपटे पूर्ण वृक्षाच्या रुपात व्यक्त होण्यापूर्वी अव्यक्त अवस्थेत असते.

थोडक्यात परिवर्तनाच्या द्वारा अव्यक्तक्षमता वास्तव घटना बनते किंवा प्रकटता धारण करते. **अव्यक्त क्षमतेकडून पूर्ण प्रकटीकरणाकडे जाण्याची प्रक्रिया हीच बदल किंवा परिवर्तन (Change) असते** असे ॲरिस्टॉटलचे मत आहे.

## चर्तुवर्ग कारणमीमांसा : कार्यकारण सिध्दान्त .

कोणतीही घटना घडली की कशी व का घडली ? असे प्रश्न मनात सहज येतात. जगात जे जे घडते त्या प्रत्येक घटनेमागे कारण असलेच पाहिजे, असे वाटते.जे घडते, जन्माला येते, अस्तित्वात येते त्याला दुसरी एक किंवा अनेक घटना जबाबदार व कारणीभूत असतात, कोणतीही घटना स्वत:हून घडत नाही.कारणाशिवाय काहीच घडत नाही,असा विश्वास प्रत्येक सुशिक्षित, निरक्षर, बुध्दिमान,कमी बुध्दिमान माणसाला वाटतो. त्याला

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

तर्कशास्त्राचे ज्ञान असो किंवा नसो.कारणकल्पना जणू स्वयंसिध्द, निश्चित व संशयापलिकडील आहे, अशीच जणू अंधश्रध्दा असते !

कारण म्हणजे काय ? जे काही निर्माण करते ते कारण आणि जे निर्माण होते ते कार्य.कार्य हे नेहमी कारणाहून भिन्न, संपूर्ण नवीन असते.प्रत्येक घटनेमागे काहीतरी कारण असतेच.घटना सामाजिक अथवा नैसर्गिक अशा दोन मुख्य प्रकारची असते.व्यवहारातील शुभ- अशुभ इत्यादी बाबत आपण कार्यकारणभाव पाहात असतो.नवी नवरी घरी आली की काहीतरी नको असलेले घडते तेंव्हा नवरीलाच कारण समजले जाते.मांजर आडवे गेले की अशुभ वाटते.इत्यादी .पण ही चुकीची उदाहरणे आहेत.



कार्यकारण हा तत्त्वज्ञानातील मूलभूत व आजही वादग्रस्त प्रश्न आहे. त्याची सोडवणूक करण्याचा प्रयत्न प्रत्येक तत्त्वज्ञ करीत असतो.

## ॲरिस्टॉटलचा कार्यकारण सिध्दान्त

ॲरिस्टॉटलचा कार्यकारण सिध्दान्त हा त्याच्या सत्ताशास्त्राचा गाभा आहे.त्याने त्याचा द्रव्य आणि आकारविषयक सिध्दान्त मांडताना कारणविषयक सिध्दान्त मांडला.त्याचा द्रव्य आणि आकार विषयक सिध्दान्त म्हणजे त्याने प्लेटोच्या आयडिया सिध्दान्तावर केलेली टीका आहे.प्लेटोने वस्तूपासून द्रव्य म्हणजे आकार वेगळा केला आणि आयडियांचे जग निर्माण केले.वस्तू नसल्या तरी आयडियांचे जग अस्तित्वात असते, असे प्लेटोचे म्हणणे होते.

पण ॲरिस्टॉटल हे मत खोडून काढतो. प्लेटो ज्यास आयडिया म्हणतो त्यास ॲरिस्टॉटल आकार (Form) म्हणतो.एखादी वस्तू अस्तित्वात येते तेंव्हा ती केवळ आयडियानुसार आकाराला येत नाही तर काहीतरी द्रव्यही असते. पण द्रव्यापासून आकार वेगळ करता येत नाही. द्रव्य आणि आकार यांना केवळ विचारातच वेगळे करता येवू शकते. वास्तवात त्यांना वेगळे करणे शक्य नाही.

ॲरिस्टॉटलने कारणाचे चार प्रकार मानले.ते पुढीलप्रमाणे :

1. **द्रव्य कारण (Material Cause):** ज्या द्रव्याची वस्तू बनते ते द्रव्य.दगडी पुतळ्यात दगड हे द्रव्य . यास उपादान कारण असेही नाव आहे.
2. **आकार कारण (Formal Cause):** वस्तू अस्तित्वात येताना जो आकार ती वस्तू धारण करते ते.पुतळा हे रुप.
3. **निमित्त कारण (Efficient Cause): द्र**व्याला आकार देणारी शक्ति.पुतळ्याला आकार देणारा मूर्तिकार.
4. ***अंतिम कारण* (Final Cause):** ज्या हेतूसाठी ती वस्तू निर्माण होते ते अंतिम हेतू कारण.पुतळ्याचे रसग्रहण करणे.

ॲरिस्टॉटलच्या मते प्रत्येक वस्तू एक द्रव्य असते आणि त्या द्रव्याला काहीएक आकारही असतो.उदाहरणार्थ माती या द्रव्याला मडके,गणेशमूर्ती हे आकार असू शकतात.ते आकाराला आणणाराही कुणीतरी असतो.तो मूर्तिकार होय.पण जेथे माणूस नसेल तेथे अन्य काहीतरी असते.जसे बीमधून झाड निर्माण होते तेंव्हा झाड निर्माण करणारी शक्ति ते काम करते.ती निमित्त कारण बनते.हेतू म्हणजे ज्यासाठी ते कार्य किंवा वस्तू निर्माण होते ते प्रयोजन. घराचे प्रयोजन वास्तव्य करणे,हे असते.

येथे आकार याचा अर्थ इंग्लीशमध्ये shape म्हणतात त्यापेक्षा व्यापक आहे.वस्तूचे सारतत्त्व essence किंवा प्लेटो ज्यास आयडिया म्हणतो ते ॲरिस्टॉटलला अभिप्रेत आहे.त्यामुळे वस्तूला द्रव्यकारणाबरोबर आकारीक कारणही असतेच, *ते नाही* असे नसते.

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

ऑरिस्टॉटलच्या मते ही चार कारणे म्हणजे एकाला दुसरा पर्याय आहे,असे नसून ते चार प्रकार आहेत आणि एकाच वेळी चारही कारणे घटनेत उपस्थित असतात.कारण प्रक्रियेत चारही घटक एकाचवेळी कार्य करीत असतात. निसर्गात जे बदल घडतात किंवा माणूस जे घडवितो त्यात ही चारही कारणे समाविष्ट असतातच.

ऑरिस्टॉटलची ही कारणकल्पना आणि आजची विज्ञानातील कारणकल्पना यात फरक आहे.वैज्ञानिक अर्थाने कार्य ही वस्तू नसते तर घटना असते.घटना घडत असते तर वस्तू घडत नसते.ती टिकते.घटना घडण्याच्या क्षणापुरतीच टिकते.नंतर ती भूतकालात जाते.पण वस्तू निर्माण झाली की निर्माण होण्याच्या क्षणापासून ते नष्ट होण्याच्या क्षणापर्यंत ती टिकून राहाते.वस्तू निर्माण होणे व नष्ट होणे याही घटनाच असतात.नैसर्गिक घटनांना कारणे असतात, पण कर्ता असेलच असे नाही आणि म्हणून त्यांना हेतू असतोच, असेही नाही.जसे नदीला महापूर येतो पण त्यात हेतू नसतो.

## अव्यक्तक्षमता आणि वास्तवता (Potetaility and Reality)

कोणतीही वस्तू निर्माण होण्यासाठी किंवा एखादे कार्य होण्यासाठी, उपादान, आकारिक, निमित व अंतिम अशी चार कारणे असतात. अंतीमकारण त्या वस्तूच्या निर्मितीला प्रेरणा देते म्हणून तीला प्रेरक कारण असेही म्हटले आहे. संगमश्वरी पुतळयाच्या निर्मिती प्रकियेत संगमश्वरी दगड हे उपादान कारण, शिल्पकार हा निमित्त कारण व पुतळयाचा आकार हे आकारीक कारण असते.

आता संगमश्वरी दगडास हा किंवा तो आकर दिला गेलाच पाहिजे असे नसते. तसेच विशिष्ट आकार हे त्या दगडाचे प्रयोजन असते तो आकार त्या दगडात अनिवार्यपणे समाविष्ट असतो. याचा अर्थ त्या दगडात अनेक आकार असतात त्या अनेकांपैकी एक एवढाच दर्जा त्या विशिष्ट आकाराचा असतो अनेकांपैकी कुठलीही एक आकार धारण करण्याची क्षमता मात्र त्या दगडात असते. ती क्षमता फक्त अव्यक्त असते व्यक्त झालेली नसते म्हणून तीला ऑरिस्टॉटल *अव्यक्त क्षमता* म्हणतो

थोडक्यात द्रव्यामध्ये अनेक आकारांची क्षमता असते.कोणताही एक आकार प्रगट झाला की व्यक्त क्षमता व्यक्त होते. तिला ऑरिस्टॉटल प्रगट क्षमता म्हणतो. हीच *वास्तवता* होय. म्हणजे वास्तवता ही अनेक अव्यक्त क्षमतांपैकी एक असते.कोणती क्षमता प्रगट व्हावयाचे हे मात्र अंतिम कारणावर अवलंबून असते निमित्त कारणावर नाही.व्यक्त क्षमता उपादान कारणात आहे असे गृहित धरावे लागते एवढेच. अंतिम कारणापासून प्रेरणा मिळाल्यानंतरच ती व्यक्त होते आणि अंतिम कारण म्हणजेच **ईश्वर !**

## ईश्वर : जगाचे अंतिम कारण

भौतिक जगाचे अंतिम कारण भौतिक द्रव्य असते. जगातील वस्तू ज्या अंतिम कारणापासून निर्माण होतात ती सर्वकारणे ही द्रव्यच असतात. त्या द्रव्याला ऑरिस्टॉटलन आत्मा म्हणतो. हा परमात्मा असून तोच ईश्वर होय.

## *'अचल चालक'*

ऑरिस्टॉटलच्या मते विश्वात घडणाऱ्या प्रत्येक घटनेला, कार्याला काहीतरी कारण आहे, प्रेरक शक्ति आहे. पण शक्ति स्वत: मात्र कशाचीही कार्य नाही. तिला कुणी निर्माण केलेले नाही.ती सर्वाचे कारण आहे पण तिला कारण नाही. ती विश्वातील प्रत्येक गतिचे, हालचालीचे कारण आहे पण तिला स्वत:ला गति नाही.शिवाय तिला आकारही नाही.या कारणाला ऑरिस्टॉटल *'अचल चालक' (Unmoved Mover)* किंवा *आद्य चालक* **(First Mover)** हे नाव देतो. तसाच तो अनिवार्यपणे अनादी अत्यंत अनिर्मित सनातन आहे. आद्य म्हणजे परम श्रेष्ठ (supreme ) असा घेतला पाहीजे.तोच ईश्वर होय.

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

## आद्य प्रेरक शक्ति

ॲरिस्टॉटलच्या मते ईश्वर जग निर्माण करीत नाही, तो कर्ता नाही.हे जग अनादी कालापासून अस्तित्वात आहेच.ते अनंत, अजात, अनिर्मित आहे.ईश्वर फक्त जगाला आकार देतो, याचा अर्थ तो जगाला चालना देतो, गती देतो.तो पहिला स्वर्ग स्वत: प्रत्यक्ष हलवितो, ताऱ्यांना, ग्रहांना ढकलतो,गती देतो.एकदा जग गतिमान झाले की मग तो निवृत्त होतो.मग तो जगाकडे लक्ष देत नाही.

ईश्वर जगाला गती देतो म्हणजे काय करतो ? म्हणजे तो फक्त आकार देतो. जगाच्या द्रव्य, उपादान कारणांना तो फक्त आकारिक कारण पुरवितो. त्यामुळे आधी नसलेला आकार जगाला प्राप्त होते. त्या विशिष्ट रचनेतून विश्व साकारते. आणि गतीमान होते एवढेच. जगाची निर्मिती ईश्वराकडून होत नाही. फक्त गती मिळते.

थोडक्यात दृश्य रित्या गतीमान व अदृश्यरित्या सुदधा गतीमान असलेल्या प्रत्येक गतीचे काहीतरी कारण असतेच. त्या फरकाला ॲरिस्टॉटल ***आद्य प्रेरक शक्ति*** असे नाव देतो.

या प्रेरक शक्तीला एका विशिष्ट अर्थ आहे. आद्य म्हणजे पहिली असा नव्हे. कारण पहिले दुसरे तिसरे या संकल्पना कालाच्या सापेक्ष असतात पण आद्यता काळाच्या पलिकडची आहे.काळसुदधा या शक्तीकडून नियमित होतो. ही शक्ती आधीच स्पष्ट केल्याप्रमाणे परश्रेष्ठ आहे. म्हणून काला पलीकडील पण काळासह सर्व विश्वाला गती देणारे तत्व तेच तर ईश्वर होय.

## *'विचारांचा विचार'*

विश्वाला गती दिल्यानंतर दुर्लक्ष करुन करतो काय ? कारण एकदा गती मिळाली कि विश्व आपोआप चालत राहते. मग ईश्वराचे काम काय ? ॲरिस्टॉटल म्हणतो. असा ईश्वर चिंतन करतो कशाचे? कुणाचे ? तर स्वत:चे ! त्याच्या चिंतनाचा विषय तो स्वत:च असतो. कारण जगातून काहीतरी घ्यावे असे त्याला काही उरलेलेच नसते.म्हणून तो स्वत:चे चिंतन करतो. स्वत:चेच ज्ञान मिळवतो. हे तो कसे करतो ? त्यासाठी ईश्वराचे स्वरूप पाहावे लागेल.

हा ईश्वर व्यक्तिरुप नाही.तो केवल विचाररुप आहे.तेच त्याचे स्वरुप आहे.तो अशरीरी आहे. त्यामुळे तो शारीरीक हालचाली करीत नसतो.त्याच्या हालचाली वैचारिक, आध्यात्मिक , बौध्दिक स्वरुपाच्या असतात. मग अशा ईश्वराच्या वैचारिक कृतीचा विषय कोणता ? तर विचार करणे, चिंतन करणे हाच त्याचा विषय असतो.मग जगाला गति दिली की तो विचार करीत बसतो.तो पूर्ण आत्मकेंद्रित आहे. फक्त आत्मचिंतनात मग्न होतो.तो केवळ विचारस्वरुप उरतो.म्हणून ॲरिस्टॉटल त्यास ***'विचारांचा विचार' (The Thought of The Thoughts)*** म्हणतो.

## ईश्वराच्या ज्ञानाचा मार्ग

ईश्वर या तत्वाचे अस्तित्व कसे कळते ? तर अनुमानाने कळते. जग आणि जगातील गती यांच्या आधारे हे अनुमान करता येते. जगातील प्रत्येक वस्तूस स्वत:ची एक गती असते. गती नाही अशी वस्तुच नाही. दगडाला सुदधा गतीच असते. पृथ्वीलाही गती असते पण ती हलताना दिसत नाही.हे विश्व इतके प्रचंड आहे की त्याची कल्पनाच करता येत नाही, पण ते गतिमान आहे, याचा अर्थ गति देणार कुणीतर म्हणजे ईश्वर, असा तर्क लावता गतिवरून ईश्वराचे अनुमान शक्य आहे, असे ॲरिस्टॉटलचे म्हणणे आहे.

थोडक्यात ॲरिस्टॉटलच्या मते ईश्वर जगाचे आद्य कारण असून तो केवळ, आधीपासून अस्तित्वात असलेल्या जगाची व्यवस्था लावतो.द्रव्यापासून वस्तू तयार व्हावी, तसेच ईश्वरापासून जग तयार झालेले नाही. तर

ईश्वराने जगाची केवळ व्यवस्था लावलेली आहे.तो अशरिरी असल्याने जगाच्या व्यवस्थेतून बाहेर राहणारा आणि व्यवस्था लागल्यानंतर काहीच काम न उरलेला म्हणून आत्मचिंतन करणारा असतो.

याचा अर्थ एखादया खूप मोठया कंपनीतील सर व्यवस्थापकाने जे काम असते,तसे ईश्वराचे काम असते. ईश्वर जगाचा सर व्यवस्थापक असतो. या अर्थाने ईश्वर हे अंतिम कारण व्यवस्थापन कारण आहे. जग निर्माण होतानाची प्रकिया घडताना वरील चारही कारणे विशिष्ट पध्दतीने काम करतात.

## भावविश्वाबाहेर

असा व्यवस्थापक ईश्वर भक्तांना पावणारा नाही. त्याच्याशी स्नेह, प्रेम जोडता येत नाही.जगाकडे दुर्लक्ष करणारा ईश्वर भक्तांच्या हाकेला धावून जात नाही, त्यांची भावनिक गरज पूर्ण करीत नाही, तो उपयुक्त नाही. परिणामी ईश्वर मानवी भावविश्वाबाहेर राहतो !

--------------------------------------------

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner